# प्रारब्ध

अविनाश एकटाच खिडकीतून दूरवर बघत होता. नजर शून्यात, चेहऱ्यावर खिन्नतेचे सावट. आपल्या आजूबाजूला कोणी आहे की नाही याचेही त्याला भान नव्हते. असा कितीतरी वेळ गेला; दूर उभी राहून अस्मिता त्याची आई त्याच्याकडे लक्ष ठेवून होती.

त्याला पूर्ववत करण्यासाठी काय करावे हेच तिला कळत नव्हते. तिच्याकडून सर्व प्रयत्न करून झाले, पण तरीही हसता-खेळता, उत्साहाने भरलेला अवी तिला अजून भेटला नाही. असं कसं झालं, याचा विचार करतांना तिला पूर्वीचे दिवस आठवले ....

'अस्मिता आणि अमेय' यांची जोडी सगळ्या नातलगांमध्ये, परीचितांमध्ये आदर्श दांपत्य म्हणून प्रसिद्ध होती. लग्नाला १८/१९ वर्षे झाली. आपल्या प्रेमळ स्वभावाने त्यांनी खूप माणसं जोडली होती. दोघेही नोकरी करायचे. घरात अमेयच्या आई असायच्या. त्यामुळे अस्मिताला घरची, मुलाची काळजी नव्हती. ती पण सासुबाईंना जमेल तशी घरकामात मदत करायची. सासुबाईंच्या मदतीसाठी 'मालतीबाई' होत्या. घरातील सदस्याप्रमाणेच त्या मिळून मिसळून राहायच्या. लग्नानंतर दोन वर्षांनी त्यांच्या कुटुंबात चिमुकल्या पावलांचे - अविनाशचे आगमन झाले होते. आजीला तर नातवाचे खूपच कौतुक होते. त्याच्या बाललीला बघतांना आई बाबांना अगदि धन्य धन्य वाटायचे.

अविनाश होताही तसाच लाघवी. सगळ्यांच्या प्रेमळ छत्रछायेखाली तो हळूहळू मोठा होवू लागला. चांगली शाळा, शेजार, सवंगडी आणि नातेवाईक यांच्या प्रेमळ सहवासात तो ८ व्या इयत्तेपर्यंत पोहचला. आणि मग अचानकच तो कठीण प्रसंगाचा काळ सुरू झाला.

देशभर कोरोनाचे सावट पसरले. त्या विळख्यात कितीही काळजी घेतली तरी कसा कोण जाणे 'अमेयला' त्याचा संसर्ग झाला. वेळच अशी होती की विलगीकरणामुळे मनुष्यबळ हाताशी असूनही कोणीच मदतीला येवू शकले नाही. अस्मिताने कसेबसे अमेयला' डॉक्टरांकडे नेले. तेव्हा तर त्याला श्वासही नीट घेता येत नव्हता. दवाखान्यात याच्यासारखी माणसांची रीघ; ॲडमिट करायचे पण कुठेच बेड मिळेना.. ॲब्युलन्समधे अमेयला घेवून अस्मिता

सकाळी १० वाजल्यापासून या दवाखान्यातून त्या दवाखान्यात फिरत होती. शेवटी रात्री ८ वाजता सुश्रुषा हॉस्पिटल मध्ये मोठ्या मुश्किलीने १ बेड रीकामा होता. तो मिळाला. धापा टाकत अमेय अस्मिताला म्हणाला, 'तू घरी जा; आता डॉक्टरांच्या ताब्यात मला दिलंस नं ?? घरी आईची, अवीची काळजी घे. स्वत:कडे दुर्लक्ष करु नकोस.' तसेही आय सी यु मध्ये जवळ कोणी थांबु शकत नव्हते. एक एक शब्द बोलत असतांना त्याला जो त्रास होत होता तो तिच्याच्याने बघवेना; उद्या सकाळी येते, असे म्हणून तिने अमेयचा निरोप घेतला. दुर्दैवाने तो अखेरचाच ठरला. सकाळी ७ वाजताच घरी फोन आला... आणि सगळं संपलं !! तिचा जीवनसहचर, आईचा लाडका अमेय, अवीचे प्रिय प्रिय बाबा सगळ्यांना सोडून देवाघरी निघून गेले....

वाईट याचचं वाटत होतं की त्याचं अंत्यदर्शनही घेता आलं नाही. ८ दिवसात कसं होत्याचं नव्हतं झालं ?? सांभाळायचं तरी कोणी कोणाला ?? धीर द्यायला शब्दच जणू गोठून गेले; त्यातच डॉक्टरांनी अस्मितालाही घरातल्या घरात १४ दिवस विलगीकरणात रहाण्यास सांगितले !! घर तर जणू वाळीत टाकल्यासारखं झालं होतं.. दूध, भाजी, किराणा ऑनलाईनने दाराशी येऊन ठेवायचे. आजी आणि अविनाश दोघेही भांबावून गेले होते. आता दिवस संपता संपेना.. भिरभिरलेल्या, तडफडलेल्या पाखरासारखी अवीची अवस्था झाली होती. त्याच्याकडे बघून आजीने कंबर कसली; त्या जबरदस्तीने अवीला खाऊ पिऊ घालू लागल्या; त्याला म्हणायच्या, आकाशातून स्टार बनून तुझा बाबा तुला बघतो आहे, तू असा धीर सोडून कसं चालेल ? आई बरी होणारच आहे. आपल्यालाच तिला सांभाळायचं आहे नं ?? इकडच्या तिकडच्या खुप गोष्टी सांगून त्याचं मन रमवु लागली. स्वत:ला दु:ख करायला आजीकडे आजिबातच वेळ नव्हता. अविनाशच्या बालमनावर झालेला आघात.. त्याची तीव्रता त्यांच्यापर्यंत पोहचलीच नव्हती. बाबांची हसरी-प्रसन्न मुद्रा, त्यांनी बोललेले शब्द न शब्द त्याला आठवायचे; बाबा जणु आपल्या समोरच बसले आहेत असं समजून तो त्यांच्याशी बोलायचा...

आजी आणि अस्मिता तर घाबरुनच गेल्या. बाबा या जगात नाहीत हे तो मानायलाच तयार नव्हता.

फोन करून आस्मिना डॉक्टरांना ही सगळी परिस्थिती सांगु लागली. पण त्यांच्याही प्रयत्नांना यश येईना. विलगीकरणाच्या भयंकर विळख्यातून अखेर आस्मीना बाहेर आली. पहिले अविनाशाला वास्तवतेची जाणीव करून द्यायची हाच एक विचार पक्का केला. त्याला स्पष्ट शब्दात सांगितलं. टि.व्ही वर कोविडने कसे थैमान घातले हे दाखवले.. कोणी कोणाकडे जावु शकत नाही ही परिस्थिती आहे.. असं करता करता शेवटी एकदे त्याला 'आपले बाबा आता आपल्याजवळ नाहीत, ते देवाघरी गेले.. पुन्हा परत येणार नाही' याची जाणीव झाली. त्याला खाणे-पिणे-बोलणे-कशाचेच भान नव्हते. तो चूपचाप पलंगावर कींवा खुर्चीवर बसून रहत असे. चेहरा अगदि भावहीन ना खेद ना खंत. दिवसभरात एखादा शब्द बोलला तर बोलला. कसेबसे दोन घास खायचा...

आस्मिनाने 'अभय' गेल्याचे दुःख कसेबसे आवरले तिच्यासमोर अवीचा मोठ्ठा प्रश्न होता.. त्याला कसं पुन्हा माणसात आणायच? आजी आणि आस्मिना एकमेकींच्या साहय्याने धीर देत होत्या 'दिवस पालटतील आणि अवी या दुःखाच्या गर्तेतून बाहेर पडेल' या आशेवर तग धरून होत्या.

आस्मिनाच काम ऑन लाईन सुरु होतं. काम तर तिला करावच लागे. अवीची शाळा पण ऑन लाईन सुरु झाली. पण अवी प्रतिसादच देईना. आस्मिना त्याच्या मित्रांना फोनवरून बोल, म्हणून सांगायची. टिचरला देखिल तिने अवीशी धीराचे दोन शब्द सांगा म्हणून विनंती केली. सगळे जण आपापल्या परीने प्रयत्न करु लागले.. पण एकटेपणा कांही जात नव्हता तो कोणाशीच फोनवर नीट बोलत नव्हता. त्यातल्या त्यात एक समाधान म्हणजे तो अधांतर पुस्तके अधून-मधून वाचू लागला. आस्मिनानेही मग प्रतिकुल परिस्थीतीत हार न मानणाऱ्यांची महीती असणारी पुस्तके टेबलवर आणून ठेवली. 'कोशिश करने वालोंकी कभी हार नहीं होती' ही कविता कींवा 'दुःख दे देवा परंतू सोसण्याची शक्ती दे' या कवितांचा परिणाम म्हणून की काय त्याचा संवाद थोडाफार वाढू लागला. आपल्या प्रयत्नांना यश येवो म्हणून आजी आपले वय विसरून आस्मिना आपले दुःख विसरून पुन्हा पुन्हा त्याला कार्यरत करण्यासाठी धडपडू लागल्या.

आस्मिना आजीला म्हणाली, आई, आपल्या

जीवनात असं कां घडावं ?? सगळ्यांशी चांगलं वागणारा, कधीच कोणाला न दुखवणारा. संवेदनशील असा माझा अवी कां कोमेजून राहीला ?? इतक्या लहान वयात त्याला एवढ्या मोठ्या दुःखाला सामोरे जावे लागते आहे ?? आजी अस्मीताला समजवायच्या - म्हणायच्या, अस्मीता याला़च 'प्राक्तन' म्हणतात. देव आपली परिक्षा पाहत आहे.. आता अश्रेयची साथ नाही हे मनाने स्विकारलं.. परंतु अविनाशच्या जीवनात उज्वल प्रकाश लाभु दे यासाठी आता सगळा अट्टाहास करायचा. देव दयाळू आहे. तो नक्कीच आपल्या प्रयत्नांना यश देईल. आपण त्या दिवसाची न थकता वाट पाहू'

या आजींच्या आश्वासक शब्दांनी अस्मिता पुन्हा पुन्हा जोमाने प्रयत्न करायची. कधी त्याची टिचर. मित्र. बनून त्याच्या मनातील मळभ दूर करण्याचा प्रयत्न करायची !! तिचे प्रयत्न आणि आपल्या सगळ्या हितचिंतकांच्या सदिच्छा यामुळे अविनाश नक्कीच आलेल्या परिस्थितीला तोंड देवून "याला जीवन ऐसे नांव" ही उक्ती खरी करो हेच ईश्वरचरणी प्रार्थना करुया !!

कोथरूड, पुणे

सौ. विजया पुरुषोत्तम जोशी
मोबाईल नं. 8308694751

